# अदानी इलेक्ट्रिसिटीच्या कर्मचाऱ्यांची गणेशविसर्जन स्थळी साफसफाई मोहीम

मुंबई – अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल)च्या कर्मचाऱ्यांनी यंदाच्या गणेश चतुर्थीचा उत्सव वेगळ्या तऱ्हेने साजरा केला. भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियाना'नुसार, यंदाचा हा उत्सव कंपनीचे कर्मचारी 'स्वच्छता ही सेवा' या चळवळीत योगदान देण्याची शपथ ग्रहण करून साजरा करीत आहेत. या दोन आठवडे चालणाऱ्या देशव्यापी मोहिमेला पाठबळ म्हणून, एईएमएलचे कर्मचारी हे मुंबई शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांवरील एईएमएल कार्यालयाच्या परिसरातील रस्त्यांच्या स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होणार आहेत. एक संघ या नात्याने काम करीत, जवळपास २५०० कर्मचारी हे वेगवेगळ्या पथकांअंतर्गत काम करतील, ज्यात कार्यालयाअंतर्गत व बाहेर फेकल्या कचऱ्यासह आजूबाजूच्या परिसरात कचरा एकत्र करणार आहेत. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात एईएमएलच्या १५०० कर्मचाऱ्यांसह आज सकाळपासूनच सुरु झाली. या व्यापक स्वच्छता मोहिमेअंतर्गत मुंबईतील गणपती विसर्जन स्थळांनाही सामावून घेतले जाणार आहे. विसर्जनाच्या दिवशी तलावांच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांचे पथक तलावांशेजारी तैनात केले जाणार आहेत. प्रत्येक उत्सव साजरा करताना, काही जबाबदाऱ्यांचे पालनही आवश्यक असते याबद्दल नागरिकांना सजग करणे हा देखील या मोहिमेमागील उद्देश आहे.